N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म-१)

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** अकोला
**P.S.(ठाणे):** उरळ
**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0266
**Year (वर्ष):** 2025
**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 30/09/2025 04:40

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**
1. **Day(दिवस):** सोमवार
**Date From (दिनांक पासून):** 29/09/2025
**Time Period (कालावधी):** पहर 5
**Date To ( दिनांक पर्यंत):** 29/09/2025
**Time From (वेळेपासून):** 14:35 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 15:45 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 30/09/2025
**Time (वेळ):** 03:00 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
**Entry No. (नोंद क्र.):** 002
**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 30/09/2025 04:09 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी
5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**
1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
पश्चिम, 6 किमी
**Beat No. (बिट क्र.):**
(b) **Address (पत्ता):** शेगाव ते अकोट रोडवरील, निंबा फाटा येथील ,श्रीकपा पेट्रोल

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**

पोलीस स्टेशन, उरळ
जिल्हा अकोला



6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** श्री विलास सुपडसींग गुसींगे पोलीस निरीक्षक लाचलूचपत प्रतिबंधक विभाग बूलढाना

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1985

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | लाचलूचपत प्रतिबंधक धिभाग,बूलढाना,बुलढाणा,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | लाचलूचपत प्रतिबंधक विभाग,बूलढाना,बुलढाणा,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):** 91-9834807244

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | सतिश सुभाष कराड महसुल अधिकारी तलाठी सज्जा ह भाग 2 वर्ग-3 तहसिल कार्यालय | | | 1. ह मुगजानन पलेस, , गजानन पेठ, अकोला ताजि अकोला,उरळ,अकोला,महाराष्ट्र, भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

पो स्टे ला आल्यावर त्वरीत दाखल

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 500/रुपये दराच्या भारतीय चलनातील 100 नोटा | 50,000.00 |
| 2 | इतर | संकीर्ण/विविध | भारतीय बच्चो का बैंक, बच्चो व्दारा प्रत्याभूतअशा 500/रुपये दराच्या वर्णनाच्या 100 खेळणी नोटा | 0.00 |

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

50,000.00

11.**Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12.**First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

फिर्याद कॅम्प पो स्टे उरळ जि अकोला दिनांक 29/09/2025श्री विलास सुपडसींग गुसींगे वय 40 वर्षे व्यवसाय नोकरी पद पोलीस निरीक्षक लाचलूचपत प्रतिबंधक विभाग, बूलढाना मो.नं. 9834807244मी आज रोजी सरतर्फे समक्ष फिर्याद देतो की मी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग बुलढाना येथे पोलीस निरीक्षक म्हणुन माहे जुलै 2025 पासून कार्यरत आहे. दि.23/09/2025 रोजी ला प्र वि कार्यालय बूलढाना येथे हजार असतांना आम्हास मा अपर पोलीस अधिक्षक ला प्र वि अमरावती परिक्षेत्र अमरावती यांनी मौखिक सुचना दिली की लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, अकोला येथे कारवाई पथकासह जावून पोलीस उपअधिक्षक श्री मीलींदकुमार बाहकर यांची भेट घेवुन त्यांचे आदेशाप्रमाणे कारवाई करावी असे कळविल्यानुसार आम्ही सोबत सापळा कार्यवाहीकरीता लागणारे सर्व साहीत्य सह व कार्यावही पथकासह बुलढाणा येथुन शासकीय वाहन क्रमांक एम २८ सी 6484ने खामगाव मार्गे अकोला येथे पोहचुन ला प्र.वि. अकोला कार्यालयात पोलीस उप पोउपअधि श्री. बहाकर यांची भेट घेतली. पोउपअधि श्री. बहाकर यांनी त्यांचे कार्यालयात हजर असलेल्या एका इसमाचा परिचय करून दिला की ते तक्रारदार श्री. प्रविण भगवान काळदाते वय 32 वर्ष शिक्षण BA व्यवसाय शेती रा नया अंदुरा ता. बाळापूर जि. अकोला मो. नं.7875799261 असे असून त्यांची एका लोकसेवका विरुध्द लाचेची मागणी करीत असल्याची तक्रार असून तक्रारदार यांचे तक्रारीनुसार कारवाई करावी असे आदेशीत केले त्यानुसार आम्ही जिल्हा महिला व बालविकास अधिकारी, अकोला यांना पत्र देवून दोन शासकीय पंच उपलब्ध करुन घेतले. त्यानंतर तक्रारदार श्री. काळदाते व पंचांचा आपसात परिचय करुन दिला. त्यानंतर पंचासमक्ष तक्रारदार यांना त्यांची तक्रार तोंडी कथन करण्यास सांगीतली असतात तक्रारदार यांनी सांगीतले की, त्यानी सन 2024 मध्ये कारंजा रमजानूर शिवारामध्ये गट नं 335 मध्ये ७ एकर शेती खरेदी केली होती. सदर शेती भूमी अभिलेख कार्यालयाकडील मोजणी दरम्यान तक्रारदार यांना समजते की, त्यांनी खरेदी केलेल्या शेतीचा गट नं.335 नसून गट नंबर 334 आहे. सदर शेतीचा गट नंबर 334 च्या ऐवजी 335 अशी दुरुस्ती करण्यांसंबंधाने गावाचे तलाठी श्री कराड थांना भेटले असता त्यांनी शेतीचा गट नंबर दुरुस्ती करण्यासाठी 125000/- रूपये लागतील असे म्हणुन लाचेची मागणी केली, तसेच दिनांक 17.09.2025 रोजी तक्रारदार यांनी गट नंबर दुरुस्ती होणेकरिता तहसिल कार्यालय, बाळापूर येथे रितसर अर्ज दिला आहे. तक्रारदार यांना तलाठी श्री. कराड हे मागणी करीत असलेले 1,25,000/- रूपये लाचेची रक्कम असल्याने त्यांची खात्री झाल्याने तक्रारदार श्री काळदाते यांचेकडून तलाठी श्री कराड यांना लाच घेतांना पकडून त्यांचेविरुध्द कायदेशीर कारवाई करावी अशी आशयाची तक्रार श्री. काळदाते यांनी पंचासमक्ष कथन केली. त्यानंतर दोन्ही पंचासमक्ष तक्रारदार श्री प्रविण काळदाते यांची तक्रार ला.प्र. वि.अकोला कार्यालयातील एका संगणकावर टंकलिखीत करुन प्रिन्ट काढुन पंचांना वाचण्यास दिली. पंचांची खात्री झाल्यानंतर सदर तक्रारीवर पंच क्र १ श्री चोरपगार यांनी शेरा लिहुन दोन्ही पंचांनी सहया केल्या व समक्ष म्हणून आम्ही सुध्दा सही केली. त्यानंतर तक्रारदार श्री. प्रविण काळदाते, पंच क्र 1 श्री राहुल राजु चोरपगार व पंच क्र 2 श्रीमती हर्षाली शिवचरण गजभिये यांना

पडताळणी कार्यवाही संबंधाने तसेच व्हॉईस रेकॉर्डर बाबत सुचना देवुन सविस्तर पडताळणीपुर्व पंचनामा करण्यात आला. त्यानंतर तक्रारदार श्री प्रविण काळदाते यांना लोकसेवक श्री. सतिश कराड पद तलाठी हे सध्या कोठे भेटतील असे विचारले असता तक्रारदार यांनी सांगीतले की, मी माहीती घेतली असता तलाठी श्री. कराड हे आजरोजी गावात आलेले नाहीत, तलाठी श्री. कराड हे उदा दि.24.09.2025 रोजी गावात येणार असल्याचे सांगीतल्याने सदर प्रकरणात दि.24.09.2025 रोजी पडताळणी कारवाई आयोजीत करण्याचे सर्वानुमते ठरविण्यात आले.दिनाक 24.092025 रोजी तक्रारदार श्री.प्रविण काळदाते यांनी लोकसेवक श्री. सतिश कराड हे आज रोजी गावात येणार असुन तलाठी श्री कराड यांनी मला भेटण्यासाठी शेगाव ते अकोट रोडवरील निमा फाटा येथे बोलविले आहे असे सांगीतलेवरुन दि.24.09.2025 रोजी 14.52 वा ते 15.15 वा दरम्यान लोकसेवक श्री. कराड यांची शेगाव ते अकोट रोडवरील निंबा फाटा येथे रितसर लाच मागणी पडताळणी आयोजित केली असता तलाठी श्री कराड यांनी, पहा मी मुले सांगेल ये, तसं त्या हिशोबानं करावं लागते आपल्याले, ते क्षेत्र जास्त आहे, म्हणून ते क्षेत्राचा विषय असतो का नी, राऊंड फिगर एक पर्यंत करून टाकु, मग आपणच देवुन टाका तु पुढच्या आठवडया पर्यत तयारी करून ठेव तुले हातोहात काम अधि तुले सातबारे करून देतो मी डायरेक, असे म्हणून लोकसेवक श्री. सतिश कराड, पद तलाठी यांनी स्वतः आर्थिक गैरलाभ पोहचावा या उददेशाने सदर लाच रक्कम मागणी करून लाच स्विकारण्यासाठी संमती दर्शवली. तसेच तकारदार श्री. काळदाते यांना पुढच्या आठवडयापर्यंत पैश्याची व्यवस्था करुन भेटण्याचे सांगीतले. त्यावरुन तकारदार श्री प्रविण काळदाते यांनी लाच रकमेची व्यवस्था केल्यानंतर सदर प्रकरणात सापळा कार्यवाही आयोजित करण्याचे ठरविण्यात आले होते. दिनांक 24.09.2025 रोजी आयोजीत पडताळणी कार्यवाहीचा सविस्तर पडताळणी पंचनामा करण्यात आला.दिनांक 28/09/2025 रोजी तकारदार श्री प्रविण काळदाते यांनी आम्हास लाच रक्कम 1,00,000/- रुपयांपैकी 50,000/- रुपयांची व्यवस्था केली असुन उर्वरीत रक्कमेची व्यवस्था करणेबाबत कळविल्यानुसार आम्ही 500 रुपयांसारख्या दिसणाऱ्या भारतीय बच्चों का बैंक, बच्यो व्दारा प्रत्याभूत अशा वर्णनाच्या 100 खेळणी नोटा उपलब्ध करुन घेवुन दिनांक 29/09/2025 रोजी पंचांना सोबत घेवुन सदर प्रकरणात सापळा कार्यवाही आयोजित करणे असल्याने सापळा कार्यवाही कामी लागणारे आवश्यक सर्व साहित्यासह अकोला ते तेल्हारा रोडवरील स्वयंभु महादेव मंदीर शिवारात हजर आलो. तक्रारदार श्री. प्रविण काळदाते हे सुध्दा आमचे सुचनेप्रमाणे सदर ठिकाणी हजर आले. त्यानंतर तक्रारदार यांना शासकीय वाहनात बसवुन घेवुन लोकसेवक श्री. कराड पद तलाठी यांना लाच रक्कम म्हणून देण्यासाठी लाच रक्कम हजर करण्यास सांगीतले असता, तकारदार श्री. काळदाते यांनी 500/-रुपये दराच्या भारतीय चलनातील 100 नोटा असे एकूण 50000/- रुपये हजर केले त्यानंतर सदर नोटांचे क्रमांक नोंदवुन घेण्यात आले. तसेच उर्वरीत 50000/- रूपये रक्कमेकरीता भारतीय बच्चो का बैंक, बच्चो व्दारा प्रत्याभुत अशा वर्णनाच्या 100 खेळणी नोटा वापरण्यात येणार असल्याबाबत तक्रारदार व पंचांना सांगीतले त्यानंतर तक्रारदार व पंच यांना अॅन्थ्रासिन पावडर चे गुणधर्म व अल्ट्राव्हॉयलेट बॅटरी याबाबत माहीती देवुन सदर नोटा एकत्र करुन नोटांना अॅन्थ्रासीन पावडर लावण्याची प्रक्रिया पुर्ण केली. त्यानंतर अॅन्थ्रासीन पावडर लावलेली लाच रक्कम तकारदार काळदाते यांच्या पॅन्टच्या डाव्या बाजुच्या खिश्यात ठेवून तक्रारदार श्री. काळदाते व पंचाना सापळा कार्यवाहीबाबत सविस्तर सुचना दिल्या व सविस्तर सापळा पूर्व पंचनामा करण्यात आला आहे.त्यानंतर तकारदार श्री काळदाते यांना लोकसेवक श्री. कराड पद तलाठी हे कोठे भेटतील याबाबत त्यांना फोन करुन विचारणा करणेबाबत सांगीतल्यावरुन तकारदार श्री काळदाते यांनी लोकसेवक श्री कराड यांना विचारणा केली असता त्यांनी शेगाव ते अकोट रोडवरील निंबा फाटा येथील इन्डेन पेट्रोल पंपावर भेटणार असल्याचे सांगीतल्यावरुन सदर ठिकाणी सापळा कार्यवाही आयोजीत करण्याचे ठरविण्यात आले. त्यानंतर तकारदार श्री. काळदाते यांनी सांगुन सापळा पथकाकरीता दोन मोटार सायकल उपलब्ध करून घेतल्या.त्यानंतर तकारदार श्री. प्रविण काळदाते यांचेजवळ व्हॉईस रेकॉर्डर सुरु करुन देवुन त्यांचेसोबत पंच क.1 श्री. राहुल चोरपगार असे तक्रारदार यांचे मोटार सायकलने शेगाव ते अकोट रोडवरील निंबा फाटा येथिल इन्डेन पेट्रोल पंप येथे 14.35 वा रवाना केले. तसेच त्यांचे मागो माग दोन मोटार सायकलवर सापळा पथकातील सदस्य असे रवाना करण्यात आले. तसेच मागोमाग शासकीय वाहनात पंच क. 2 व सापळा पथकातील एक सदस्य असे शेगाव ते अकोट रोडवरील निंबा फाटा येथील इंन्डेन पेट्रोल पंप येथे सापळा कार्यवाही करीता रवाना झाले. तकारदार श्री काळदाते व पंच क्र 1 असे शेगाव ते अकोट रोडवरील निंबा फाटा येथील इन्डेन पेट्रोल पंप येथे थांबुन असतांना त्यांचे आजुबाजुने आपापले अस्तीत्व लपवुन सापळा पथकातील सदस्य उभे राहीले, तसेच शासकीय वाहन हे निंबा फाटा येथे थांबुन ठेवले. शेगाव ते अकोट रोडवरील निंबा फाटा येथील इंन्डेन पेट्रोल पंपांजवळ बराच वेळ थांबुन राहील्यानंतर लोकसेवक कराड यांनी तक्रारदार यांना दुस-या ठिकाणी फोन करून बोलवून घेतल्याने तक्रारदार श्री काळदाते व पंच क.1 असे त्यांचे मोटार सायकलने तसेच आम्ही व सापळा पथक असे मोटार सायकलने तकारदार यांचे मागोमाग रवाना झालो त्यावेळी लोकसेवक श्री. कराड

यांनी तक्रारदार यांना शेगाव रोडने येण्यास सांगीतल्याने तकारदार व पंच क्र 1 असे शेगाव रोडच्या दिशेने निघाले, तेव्हा आम्ही व सापळा पथकातील सदस्य असे तक्रारदार यांचे मोटार सायकलच्या मागोमाग गेलो. शेगाव रोड वरील श्रीकृपा पेट्रोल पम्प समोर लोकसेवक श्री. कराड तलाठी यांनी त्यांची चारचाकी मारूती ब्रिझा गाडी थाबंवून तकारदार श्री. काळदाते यांना गाडीचा दरवाज्या उघडून गाडीच्या समोरील सिटवर बसून लोकसेवक यांचे सोबत कामासंबंधाने चर्चा केली, चर्चेदरम्यान तक्रारदार म्हणाले की, देवून देवु का मंग, त्यावर लोकसेवक कराड म्हणाले की, काय करता मग असे म्हटल्याने तक्रारदार यांनी पंच क्र 1 यांचेसमक्ष त्यांचे पॅन्टचे डाव्या खिश्यातील लाच रक्कम डाव्या हाताने बाहेर काढुन लोकसेवक श्री. कराड यांचे समोर धरुन म्हणाले की, घेवुन घ्या सर, घेवुन घ्या. असे म्हटले, तेव्हा लोकसेवक श्री. कराड यांनी अच्छा अच्छा ठिक हे दे ठेवून असे म्हणुन लाचेची रक्कम डाव्या हाताने स्विकारून गाडीच्या हॅन्डब्रेकच्या समोरील बाजुस ओपन ड्राव्हरमध्ये ठेवून दिली त्यावेळी तक्रारदार यांनी आम्हास त्यांचे गळयातील रुमाल काढून हातात घेवून लाच रक्कम स्विकारल्याचा नियोजित इशारा केला असता आम्ही व सापळा पथकातील सदस्य असे तक्रारदार यांचे जवळ आलो व लोकसेवक तलाठी श्री. कराड यांना ताब्यात घेवून त्यांना त्यांचे नाव गांव विद्यारले असता त्यांनी त्यांचे नावे श्री. सतिश सुभाष कराड, वय 36 वर्षे, पद ग्राम महसुल अधिकारी (तलाठी), सज्जा हाता भाग 2, वर्ग-3. तहसिल कार्यालय, बाळापूर जि. अकोला, रा. दिनोडा ता.अकोट जि. अकोला ह.मु. गजानन पॅलेस, फलॅट नं.1 येथे किरायाने गजानन पेठ, अकोला ता. जि. अकोला असे सांगीतले. त्यानंतर आमचे सुचनेप्रमाणे पंच क्र 1 श्री चोरपगार यांनी लोकसेवक श्री. सतिश कराड यांची गाडीची झडती घेतली असता त्यांचे गाडीच्या हॅन्डब्रेकच्या समोरील बाजुस ओपन ड्राव्हरमध्ये लाचेची रक्कम मिळून आली. त्यानंतर आलोसे श्री. सतिश कराड यांना ताब्यात घेवुन पोलीस स्टेशन उरळ येथील एका कक्षात आयोजीत सापळा कार्यवाहीचा सविस्तर सापळा पंचनामा तयार करण्यात आला.तकारदार श्री. प्रविण भगवान काळदाते, वय 32 वर्ष, शिक्षण बि ए., व्यवसाय शेती रा.नया अंदुरा ता. बाळापूर जि. अकोला यांनी दिलेल्या तक्रारीवरुन दिनांक 24/09/2025 रोजी आयोजीत पडताळणी कार्यवाही दरम्यान लोकसेवक श्री. सतिश सुभाष कराड, वय 36 वर्षे, पद ग्राम महसुल अधिकारी (तलाठी), सज्जा हाता भाग 2, वर्ग-3, तहसिल कार्यालय, बाळापूर जि. अकोला, रा. दिनोडा ता. अकोट जि. अकोला ह. मु.गजानन पॅलेस, फॅलट नं.1 येथे किरायाने गजानन पेठ, अकोला ता.जि. अकोला यांनी तक्रारदाराने खरेदी केलेल्या शेतीचा गट नंबर 334 च्या ऐवजी 335 अशी दुरूस्ती करून देण्याकरीता मोबदला म्हणून तडजोडअंती 1,00,000/- रुपये (एक लाख रुपये) लाच मागणी करुन लाच रक्कम स्विकारण्यास संमती देवुन दिनांक 29/09/2025 रोजी 14.35 ते 15.45 वा दरम्यान आयोजीत सापळा कार्यवाही दरम्यान शेगाव ते अकोट रोडवरील श्रीकृपा पेट्रोल पम्पसमोर तक्रारदार यांचेकडून लाच रक्कम स्विकारुन स्वतः‌चा आर्थिक गैरलाभ करुन घेतला

13. **Action taken:** **Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

PANKAJ VINOD KAMBALE(I (Inspector)) / 15101000402PVK8801M

**or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

or (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15.**Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): PANKAJ VINOD KAME
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.): 15101000402PVK8801I

**Attachment to item 7 of First Information Report** (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र)**: Physical features, deformities and other details of the ( If known / seen )**(संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्या/पाहिलेल्या) शारीरिक वैशिष्ट्ये, व्यंग आणि इतर तपशील))

| S.No.(अ.क्र.) | Sex (लिंग) | Date/Year of Birth (जन्म तारीक/ वर्ष) | Build (बांधा) | Height (cms.) (उंची(सें. मी.)) | Complexion (रंग) | Identification Mark (s) (ओळखीच्या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |

| Deformities/ Peculiarities | Teeth (दात) | Hair (केस) | Eyes (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit(s) (पोषाखाच्या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| | | | | | |

| Language /Dialect (भाषा / बोलीभाषा) | Place Of (का स्थान) | | | | | Others (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | Burn Mark (भाजल्याच्या खुणा) | Leucoderma (कोड) | Mole (तिळ) | Scar (व्रण) | Tattoo (गोदण) | |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**
**(जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्यापेक्षा अधिक तपशील दिल्यास फक्त यातील रकान्यांची नोंद घेतली जाईल.)**